सन २०१८-१९ च्या टंचाई अंतर्गत खांबोरा ६४ खेडी, जिल्हा अकोला या प्रादेशिक पाणी पुरवठा योजनेच्या विशेष दुरुस्तीच्या प्रस्तावास प्रशासकीय मान्यता देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग
शासन निर्णय क्रमांकः टंचाई २०१९ /प्र.क्र. ३७ /पापु १४
जी. टी. रुग्णालय संकुल इमारत, ७ वा मजला,
मंत्रालय, मुंबई ४०० ००१
तारीख: १३ मे, २०१९

वाचा -

१) शासन निर्णय, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग क्रमांक: टंचाई १०९९/प्र.क्र. १२/पापु १४, दिनांक ३.२.१९९९

२) शासन निर्णय, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग क्रमांक: टंचाई २०१६/प्र.क्र.१४३/पापु १४, दिनांक ४.५.२०१६

३) विभागीय आयुक्त, अमरावती यांचे क्रमांक उपआ/विकास/पाणी टंचाई/अका/कावि/२४७/१९ दिनांक २०.०२.२०१९ चे पत्र.

४) शासन पत्र, क्रमांक: स्थासबै २०१८/प्र.क्र. २०१/पापु १४, दिनांक १०.०५.२०१९(बैठकीचे इतिवृत्त)

प्रस्तावना -

विभागीय आयुक्त, अमरावती यांनी त्यांच्या दिनांक २०.०२.२०१९ च्या पत्रान्वये सन २०१८-१९ च्या टंचाई कालावधीसाठी टंचाई उपाययोजने अंतर्गत खांबोरा ६४ खेडी, जिल्हा अकोला या प्रादेशिक पाणी पुरवठा योजनेच्या विशेष दुरुस्तीचा रुपये ९९.३२ लाख किंमतीचा प्रस्ताव प्रशासकीय मंजूरीकरिता शासनास सादर केला आहे.

पिण्याच्या पाण्याच्या टंचाई निवारणार्थ नागरी व ग्रामीण क्षेत्रातील विहित आर्थिक व भौतिक निकषाबाहेरील तात्पुरत्या पाणी पुरवठा योजना/उपाययोजनांना प्रशासकीय मंजूरी देण्यासाठी अपर मुख्य सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग यांच्या अध्यक्षतेखाली स्थापन करण्यात आलेल्या स्थायी समितीच्या दिनांक ०९ मे, २०१९ रोजी झालेल्या बैठकीत या प्रस्तावावर सविस्तर चर्चा होऊन अंदाजपत्रकामध्ये समाविष्ट पंपिंग मशिनरी व त्यानुषंगाने इतर कामे समाविष्ट असलेल्या रु. ७४.३१ लाख किंमतीच्या कामांना मंजूरी देण्यात आली. त्या अनुषंगाने सदर प्रस्तावास प्रशासकीय मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय-

प्रस्तावनेत नमूद केलेली वस्तुस्थिती विचारात घेऊन खांबोरा ६४ खेडी, जिल्हा अकोला या प्रादेशिक पाणी पुरवठा योजनेच्या विशेष दुरुस्ती अंतर्गत प्रस्तावित करण्यात आलेल्या कामांचा समावेश असलेल्या रुपये ७४.३१ लाख (रुपये चौऱ्याहत्तर लाख एकतीस हजार फक्त) किंमतीच्या प्रस्तावास खालील अटींच्या अधिन राहून टंचाई अंतर्गत प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे :-

१) जिल्हाधिकारी, अकोला यांनी खांबोरा ६४ खेडी, जिल्हा अकोला या प्रादेशिक पाणी पुरवठा योजनेच्या क्षेत्रात पाण्याची टंचाई निर्माण झाली असल्याचे सर्वप्रथम घोषित करावे.

२) सदर प्रस्तावात नमूद केलेली सर्व विशेष दुरुस्तीची कामे कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद, अकोला यांचेमार्फत राबविण्यात यावी.

३) सदर योजनेची कामे विहित पध्दतीने ई-निविदा मागविण्यात येऊन करावीत. योजनेचे काम मान्यता प्राप्त किंमतीमध्येच पूर्ण होईल याची दक्षता घ्यावी.

४) निविदा प्रक्रीया दिनांक २९ मे, २०१९ पर्यंत पूर्ण करुन कार्यादेश देणे आवश्यक आहे. या दिनांका पर्यंत उक्त कार्यवाही पूर्ण न झाल्यास योजनेची मान्यता रद्द समजण्यात येईल.

५) योजनेची कामे दिनांक १५ जून, २०१९ पर्यंत पूर्ण करुन योजनेतून पाणी पुरवठा सुरु होणे आवश्यक आहे.

६) प्रस्तावात नमूद केलेली सदर योजनेची कामे जिल्हा परिषद, अकोला यांच्या मार्फत पूर्ण करण्यात आल्यानंतर योजनेची देखभाल दुरुस्ती व योजनेचे व्यवस्थापन संबंधित ग्रामपंचायत देखभाल दुरुस्ती यंत्रणे मार्फत करणे आवश्यक राहील.

७) विभागीय आयुक्त, अमरावती यांनी सदर योजनेकरिता निविदा प्रक्रिया झाल्यानंतर योजनेच्या सुरुवातीला ५०% इतका निधी द्यावा. उर्वरित ३०% निधी विभागीय आयुक्त यांच्या स्तरावर योजनेची प्रगती आढावा विचारात घेऊन वितरीत करावा. उर्वरित २०% निधी योजना कार्यान्वित झाल्यानंतर देण्यात यावा.

८) योजनेचे काम मुदतीत पूर्ण होणे आवश्यक असल्याने योजनेच्या निविदा प्रक्रियेपासून प्रत्येक सोमवारी प्रगती अहवाल शासनास पाठविण्यात यावा.

२. याकरिता होणारा खर्च मागणी क्र. सी-६, २२४५ नैसर्गिक आपत्तीच्या निवारणासाठी सहाय्य, ०१-अवर्षण, १०२ पिण्याच्या पाण्याचा पुरवठा, ९१ - राज्य आपत्ती प्रतिसाद निधीच्या मानकानुसार खर्च, (९१)(०१) पिण्याच्या पाण्याचा आकस्मिक निकडीचा पुरवठा (२२४५००९३) (दत्तमत) (वेतनेत्तर) - ३१, सहाय्यक अनुदाने या लेखाशिर्षाखालील तरतूदीमधून भागविण्यात यावा व त्याखाली अंतिमत: खर्ची टाकण्यात यावा.

३. हा शासन निर्णय, पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाने पिण्याच्या पाण्याच्या टंचाई निवारणार्थ नागरी व ग्रामीण क्षेत्रातील विहित आर्थिक व भौतिक निकषाबाहेरील तात्पुरत्या पाणी पुरवठा योजना/ उपाययोजनांना प्रशासकीय मंजूरी देण्यासाठी अपर मुख्य सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग यांचे अध्यक्षतेखाली स्थापन करण्यात आलेल्या सचिवस्तरीय स्थायी समितीच्या दिनांक ०९ मे, २०१९ रोजी झालेल्या बैठकीत घेण्यात आलेल्या निर्णयानुसार निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०५१३११२२४५५५२८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

YASHWANT TEDGYA PADVI

Digitally signed by YASHWANT TEDGYA PADVI
DN: c=IN, st=Maharashtra,
2.5.4.20=42f023d235c1f55c387492762e66530fd58085d2893f88445cf00fc7709a8080, postalCode=400032,
street=MANTRALAYA,MUMBAI,
serialNumber=c96ec3b84dfb89ca1fbee688d0dbc9e15c61e7e091602f1cc5c94657fc4d9c86, ou=WSSD, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, cn=YASHWANT TEDGYA PADVI
Date: 2019.05.13 18:45:35 +05'30'

(य.टे. पाडवी)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. महालेखाकार, (लेखा परीक्षा / लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र-१, मुंबई
२. महालेखाकार, (लेखा परीक्षा / लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र-२, नागपूर
३. अपर मुख्य सचिव, (म.व पु.) महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई
४. अपर मुख्य सचिव, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई
५. प्रधान सचिव (२), नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई
६. सचिव, ग्राम विकास व जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई
७. सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, सिडको भवन, नवी मुंबई
८. विभागीय आयुक्त, अमरावती
९. जिल्हाधिकारी, अकोला
१०. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, अकोला
११. कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद, अकोला
१२. अपर मुख्य सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, यांचे स्वीय सहायक
१३. उप सचिव (पापु १४) पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, यांचे स्वीय सहायक
१४. पापु १४ (निवडनस्ती)